RNI No. MAHBIL /2009/35527

Reg. No. MH/MR/South-343/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष ५, अंक ३७] मंगळवार, डिसेंबर ३, २०१३/अग्रहायण १२, शके १९३५ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १३.००

**असाधारण क्रमांक ६५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३.**

## अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्र. मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/एमएडीसी/२०१३/१६५५.—विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालील विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.**— (१) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या (एमएडीसी) मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] विनियम, २०१३", असे म्हणावे.

(२) हे विनियम भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली, यांनी दि. २९ मे २००७, २४ जानेवारी २००८ आणि २७ जुलै २००९ रोजी निर्गमित केलेल्या खालील अधिसूचनांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांसाठी लागू राहतील :—

| अनु. क्र. (१) | भारत सरकारच्या अधिसूचनेचा संदर्भ क्र. (२) | अधिसूचनेचा दिनांक (३) | क्षेत्र (हेक्टरमध्ये) (४) |
|---|---|---|---|
| १ | एस. ओ ८४५ (इ) | २९ मे २००७ | १५११.५१ |
| २ | एस. ओ १४४ (इ) | २४ जानेवारी २००८ | ६६.९० |
| ३ | एस. ओ १८४२ (इ) | २७ जुलै २००९ | १८.७५ |
| | | एकूण | १५९७.१६ |

(३) हे विनियम **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**— २.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(ए) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(बी) **"विकासक"** चा अर्थ, वेळोवेळी अंमलात असलेल्या, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम-२ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील.

(सी) **"मानीव वितरण परवानाधारक"** म्हणजे 'विकासक' म्हणजेच मे. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड ('एमएडीसी') ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. ३ मार्च २०१० च्या अधिसूचना क्र. एसओ ५२८ (इ) द्वारा अधिनियमाच्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, एसइझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी एक परवानाधारक म्हणून वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

(डी) **"सर्वसाधारण अटी"** म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी;

(इ) **"एसइझेड अधिनियम"** म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (२००५ चा २८);

(एफ) **"विशेष आर्थिक क्षेत्र"** किंवा **"एसइझेड"** म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियमाच्या कलम ३ च्या उप-कलम (४) चे परंतुक आणि कलम ४ चे उप-कलम (१) (मुक्त व्यापार आणि वखार क्षेत्रासह) अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेले प्रत्येक विशेष आर्थिक क्षेत्र आणि त्यांत विद्यमान विशेष आर्थिक क्षेत्राचा समावेश असेल.

२.२ (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही अशा सर्व शब्द आणि उक्तींना विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार अर्थ राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

३. **व्याप्ती**:— महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या ('एमएडीसी' च्या) संबंधातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी या 'एमएडीसी' च्या वीज वितरण परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या विजेचे वितरण व किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

४. **"वितरणाचे क्षेत्र" किंवा "पुरवठ्याचे क्षेत्र".**— ४.१ मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय यांनी विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या उप-कलम (१) अंतर्गत निर्गमित केलेल्या एसइझेड अधिसूचनांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबींच्या अधीन राहून, संपूर्ण क्षेत्र राहील. हे क्षेत्र खालील तक्त्यात संक्षिप्तपणे देण्यात आले आहे :—

| अनु. क्र. (१) | भारत सरकारच्या अधिसूचनेचा संदर्भ क्र. (२) | अधिसूचनेचा दिनांक (३) | क्षेत्र (हेक्टरमध्ये) (४) |
|---|---|---|---|
| १ | एस. ओ. ८४५ (इ) | २९ मे २००७ | १५११.५१ |
| २ | एस.ओ. १४४ (इ) | २४ जानेवारी २००८ | ६६.९० |
| ३ | एस. ओ. १८४२ (इ) | २७ जुलै २००९ | १८.७५ |
| | | एकूण | १५९७.१६ |

सदर क्षेत्र, वीज पुरवठ्याच्या क्षेत्राच्या नकाशामध्ये अधिक तपशिलासह आरेखित करण्यात आले आहे आणि ते मानीव वितरण परवानाधारकाने आयोगाकडे सादर केले आहे. नकाशा अनुसूची-१ मध्ये जोडण्यात आला आहे.

४.२ भारत सरकारच्या वाणिज्यिक व उद्योग मंत्रालयाने भविष्यात मानीव वितरण परवानाधारकाकरिता एसइझेड अधिसूचना किंवा निरधिसूचना काढल्यास, ज्यामुळे एसइझेड क्षेत्रात बदल होत असेल तर, मानीव वितरण परवानाधारक, अशा अधिसूचना किंवा निरधिसूचनेच्या १५ दिवसांच्या आत, आयोगाला एमएडीसीच्या संबंधातील या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्याची विनंती करेल. निरधिसूचनेच्या बाबतीत, निरधिसूचित क्षेत्रातील ग्राहकांना वीज पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत, मानीव वितरण परवानाधारक एसइझेड क्षेत्रांतर्गत ग्राहकांना वीज पुरवठा करणे चालू ठेवील.

४.३ अधिनियमातील तरतुदींनुसार, जनतेला सर्व उद्देशांसाठी विजेचा पुरवठा करण्याकरिता मानीव वितरण परवानाधारकाला प्राधिकृत करण्यात आले आहे.

५. **परवान्याची मुदत.**— सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, दिनांक २९ मे २००७ पासून [म्हणजेच, ज्या दिनांकास येथील विनियम १.२ मध्ये उल्लेखलेली अधिसूचना क्र. एस.ओ.८४५ (इ), भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ कलम ४ अंतर्गत निर्गमित केली] पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीकरिता, अंमलात राहील.

६. **विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी.**— या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर लगेच मानीव वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहणीकरिता उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करील.


७. **दुरुस्ती करण्याचे अधिकार.**— आयोगाला कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदींमध्ये दुरुस्ती करता येईल. या विनियमांत करण्यात आलेला कोणताही बदल त्यासंबंधीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू होईल आणि तो बदल त्यानंतर त्याच्या फक्त बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहील किंवा राहणार नाही, जसे असेल तसे.

८. **अडचणी दूर करण्याचे अधिकार.**— या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

**अश्वनी कुमार,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक ३ डिसेंबर २०१३.

अनुसूची-१




PROJECT :- MULTIMODAL INERNATIONAL HUB AIRPORT AT NAGPUR ( MIHAN )